जा.क्र./नसका/स्थायी/सिआर-13/2021
दिनांकः- 26.08.2021

# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

## स्थायी समितीच्या सभेची सूचना

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूची ड चे प्रकरण-2 मधील नियम क्र. 3 (अ) अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूचि ड चे प्रकरण दोन मधील नियम क्र.3 (अ) (ब) अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा दिनांक 27.08.2021 रोजी सांयकाळी 05.00 वाजता **ONLINE** व्दारे आयोजीत केली आहे.

करिता विनंती की, प्रस्तावित सभेस निर्धारीत समयी **ONLINE** सभेस उपस्थित राहून सहकार्य करावे.

(स. अजीतपालसिंघ संधु)
नगरसचिव,
नांवाशमनपा, नांदेड.

( गाडीवाले विरेंद्रसिंघ जगतसिंघ )
सभापती,
स्थायी समिती, नांवाशमनपा, नांदेड.

**प्रति,**
**श्री / श्रीमती ----------------------------------------------**
**सदस्य / सदस्या, स्थायी समिती,**
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.**

**विषय क्रं. 01**

**विषय :-** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजने अंतर्गत नावाशमनपा हद्यीत प्रभाग क्रं. 08 मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मनपा प्राथमिक शाळेच्या परिसरात व क्रिडांगण विकसीत करणे व पायाभूत सुविधा निर्माण करणे.

**संदर्भ :-** मा. जिल्हाधिकारी नांदेड यांचे प्रशासकिय मान्यता आदेश जा.क्रं. 2021/नपाप्र/टे-6 लो.अ.भा.सा.ना.व/मनपा/सिआर-58 दिनांक 31.03.21 रु. 76,89,850/-

**साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजने अंतर्गत नावाशमनपा हद्यीत प्रभाग क्रं. 08 मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मनपा प्राथमिक शाळेच्या परिसरात व क्रिडांगण विकसीत करणे व पायाभूत सुविधा निर्माण करणेसाठी रुपये 67,53,131/- करिता ई-निविदा सुचना क्रं. नावाशमनपा/साबांवि/1534/2021 दिनांक 25.02.2021 अन्वये दैनिक लोकमत विभागीय पातळी /**

Scanned with CamScanner

दैनिक सत्यप्रभा या वर्तमान पत्रातुन दिनांक 26.05.21 रोजी ई-टेंडरींग सेलव्दारे सदर कामासाठी निविदा प्रसिध्द केल्यानुसार एकूण 02 निविदा प्राप्त झाल्या प्राप्त निविदा त्रिसदस्यीय समितीसमोर दिनांक 15.07.2021 रोजी उघडण्यात आल्या असता त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटादाराने दिलेला दर |
|---|---|---|
| 01 | निलोफर कन्सट्रक्शन | अंदाजपत्रकीय दर |
| 02 | एस.एस. कन्सट्रक्शन नांदेड | 2.20% जास्त दर |

निविदाच्या तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा निलोफर कन्सट्रक्शन नांदेड यांची असुन जी अंदाजपत्रकिय दराची आहे.

करिता प्रभाग क्रं. 08 मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मनपा प्राथमिक शाळेच्या परिसरात व क्रिडांगण विकसीत करणे व पायाभूत सुविधा निर्माण करणेसाठी निलोफर कन्सट्रक्शन नांदेड यांची अंदाजपत्रकीय + GST या दराने संविदा करणेकामी मान्यतेस्तव प्रस्ताव मनपा स्थायी समिती सभेसमोर सादर.

विषय क्रं. 02

विषय :- साहित्यरत्न लोकशाही अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजने अंतर्गत नावाशमनपा हद्दीत प्रभाग क्रं. 04 वैशाची बुध्दविहार ते राहुलनगर बुध्दविहार सी.सी. रोड करणे व पेव्हर बसविणे, पार्णिमानगर गल्लीतील नाली दुरुस्ती व सी.सी. रोड दुरुस्ती करणे, राहुलनगर बुध्दीविहार प्रांगणास संरक्षक भिंत बांधणे.

संदर्भ :- मा. जिल्हाधिकारी नांदेड यांचे प्रशासकिय मान्यता आदेश क्रं. 2021/नपप्रा/टे-6/लो.अ.भा.सा.ना.व/मनपा/सिआर-58 दिनांक 31.03.2021 रु. 50,00,000/-

साहित्य रत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजने अंतर्गत नावाशमनपा हद्दीत प्रभाग क्रं. 04 वैशाची बुध्दविहार ते राहुलनगर बुध्दविहार सी.सी. रोड करणे व पेव्हर बसविणे, पोर्णिमानगर गल्लीतील नाली दुरुस्ती व सी.सी. रोड दुरुस्ती करणे, राहुलनगर बुध्दविहार प्रांगणास संरक्षक भिंत बांधणेसाठी रुपये 44,07,169/- करिता ई-निविदा सुचना क्रं. नावाशमनपा/सांबांवि/1534/2021 दिनांक 25.05.2021 अन्वये दैनिक लोकमत विभागीय पातळी / दैनिक सत्याप्रभा या वर्तमानपत्रातुन दि. 26.05.2021 रोजी ई-टेंडरींग सेलव्दारे सदर कामासाठी निविदा प्रसिध्द केल्या नुसार एकूण 02 निविदा प्राप्त झाल्या प्राप्त निविदा त्रिसदस्यीय समितीसमोर दिनांक 29.06.2021 रोजी उघडण्यात आल्या असता त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटादाराने दिलेला दर |
|---|---|---|
| 01 | पठाण मोईज अहेमद खान नांदेड | अंदाजपत्रकीय दर |
| 02 | प्रविण कन्सट्रक्शन नांदेड | 2.20% जास्त दर |

निविदाच्या तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा पठाण मोईज अहेमद खान नांदेड यांची असुन जी अंदाजपत्रकिय दराची आहे.

करिता प्रभाग क्रं. 04 वैशाची बुध्दविहार ते राहुलनगर बुध्दविहार सी.सी. रोड करणे व पेव्हर बसविणे, पोर्णिमानगर गल्लीतील नाली दुरुस्ती व सी.सी. रोड दुरुस्ती करणे, राहुलनगर बुध्दविहार प्रांगणास संरक्षक भिंत बांधणेसाठी पठाण मोईज अहेमद खान नांदेड यांची अंदाजपत्रकीय + GST या दराने संविदा करणेकामी मान्यतेस्तवचा प्रस्ताव मनपा स्थायी समिती सभेसमोर सादर.

Scanned with CamScanner

विषय क्रं. 03

विषय :- साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजने अंतर्गत नावाशमनपा हद्यीत प्रभाग क्रं. 06 लंबिनीनगर पाटी (कांबळे यांचे घरामार्गे) ते साईकिरण अपार्टमेंट पर्यंत पेव्हर ब्लॉकचा रोड करणे व ड्रेनेज व चेंबर कव्हर बसविणे.

संदर्भ :- मा. जिल्हाधिकारी नांदेड यांचे प्रशासकिय मान्यता आदेश क्रं. 2021/नपाप्र/टे-6/ लो.अ.भा.सा.ना.व/मनपा/सिआर-58 दिनांक 31.03.2021 रुपये 29,59,524/-

**साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजने अंतर्गत नावाशमनपा हद्यीत प्रभाग क्रं. 06 लुंबिनीनगर पाटी (कांबळे यांचे घरा मार्गे) ते साईकिरण अपार्टमेंट पर्यंत पेव्हर ब्लॉकचा रोड करणे व ड्रेनेज व चेंबर कव्हर बसविणे करणेसाठी** रुपये 26,14,742/- करिता ई-निविदा सुचना क्रं. नावाशमनपा/साबांवि/1534/2021 दिनांक 25.05.2021 अन्वये दैनिक लोकमत विभागीय पातळी / दैनिक सत्यप्रभा या वर्तमान पत्रातुन दिनांक 26.05.2021 रोजी इ-टेंड्रींग सेलव्दारे सदर कामासाठी निविदा प्रसिध्द केल्यानुसार एकूण 04 निविदा प्राप्त झाल्या प्रापत निविदा त्रिसदस्यीय समितीसमोर दिनांक 29.06.2021 रोजी उघडण्यात आल्या असता त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटादाराने दिलेला दर |
|---|---|---|
| 01 | लक्ष्मी नृसींह कन्सट्रक्शन नांदेड | 2.79% कमी दर |
| 02 | कामारीकर कन्सट्रक्शन नांदेड | 1.70% कमी दर |
| 03 | स्वान इन्फ्रास्ट्रक्चर नांदेड | 0.99% कमी दर |
| 04 | बी.जी. भास्करे नांदेड | 3.55% कमी दर |

निविदाच्या तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा लक्ष्मी नृसींग कन्ट्रक्शन नांदेडयांची असुन जी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 2.79% कमी दराची आहे.

**करिता प्रभाग क्रं. 06 लुंबिनीनगर पाटी (कांबळे यांचे घरा मार्गे) ते साईकिरण अपार्टमेंट पर्यंत पेव्हर ब्लॉकचा रोड करणे व ड्रेनेज व चेंबर कव्हर बसविण करणेसाठी लक्ष्मी नृसींग कन्सट्रक्शन नांदेडयांची निविदा अंदाजपत्रकिय दरापेक्षा 2.79% कमी + GST या दराने संविदा करणेकामी मान्यतेस्तवचा प्रस्ताव मनपा स्थायी समिती सभे समोर सादर.**

विषय क्रं. 04

विषय :- महसुल कॉलनी पंचशीन झेंडा परिसरात कम्पाउन्ड वॉलचे बांधकाम करणे. राजसारथी नगर मध्ये नागराज कांबळे यांचे घर ते पांचाळ यांचे घरा पर्यंत सी.सी. रस्ता करणे. सावित्रीबाई फुले नगर येथे सावित्रीबाई फुले पाटी ते कुसूम कदम यांचे घरा पर्यंत डब्ल्युबीएम व सी.सी. रस्ता करणे, दिलराज नगर येथे कोलते यांचे घर ते नरसिंग गच्चे यांचे घरापर्यंत डब्ल्युबीएम रस्ता करणे, विजयनगर येथे लांडगे यांचे घर ते सुर्वे यांचे घर, निर्मला जोंधळे यांचे घर ते कळसकर यांचे घरा पर्यंत डब्ल्युबीएम रस्ता करणे, प्रफुल्ल कॉलनी येथे सुनिल मोरे यांचे घर ते वाघमारे यांचे घरा पर्यंत डब्ल्युबीएम रस्ता करणे, प्रफुल्ल कॉलनी येथे बबन सावंत यांचे घर ते ठोंबरे यांचे घरा पर्यंत डब्ल्युबीएम रस्ता करणे, दिपकनगर येथे दवणे यांचे घर ते बंदुके यांचे घरा पर्यंत डब्ल्युबीएम रस्ता करणे.

संदर्भ :- मा. जिल्हाधिकारी नांदेड यांचे प्रशासकिय मान्यता आदेश क्रं. 2021/नपाप्र/टे-6/ लो.अ.भा.सा.ना.व/मनपा/सीआर-58 दिनांक 31.03.2021 रुपये 50,00,000/-

Scanned with CamScanner

महसुल कॉलनी पंचशील झोंडा परिसरात कम्पाउन्ड वॉलचे बांधकाम करणे, राजसारथी नगर मध्ये नागराज कांबळे यांचे घर ते पांचाळ यांचे घरा पर्यंत सी.सी. रस्ता करणे, सावित्रीबाई फुले नगर येथे सावित्रीबाई फुले पाटी ते कुराडे कदम यांचे घरा पर्यंत डब्ल्युबीएम व सी.सी. रस्ता करणे, दिलराज नगर येथे कोलते यांचे घर ते नरसिंग गच्चे यांचे घरापर्यंत डब्ल्युबीएम रस्ता करणे, विजयनगर येथे लांडगे यांचे घर ते सुर्वे यांचे घर, निर्मला जोंधळे यांचे घर ते कळसकर यांचे घरा पर्यंत डब्ल्युबीएम रस्ता करणे, प्रफुल्ल कॉलनी येथे सुनिल गोरे यांचे घर ते वाघमारे यांचे घरा पर्यंत डब्ल्युबीएम रस्ता करणे, प्रफुल्ल कॉलनी येथे बबन सावंत यांचे घर ते ठोंबरे यांचे घरा पर्यंत डब्ल्युबीएम रस्ता करणे, दिपकनगर येथे दवणे यांचे घर ते बंदुके यांचे घरा पर्यंत डब्ल्युबीएम रस्ता करणेसाठी रुपये 44,23,088/- करिता ई-निविदा सुचना क्रं. नावाशमनपा/साबांवि/1534/2021 दिनांक 25.05.2021 अन्वये दैनिक लोकमत विभागीय पातळी / दैनिक सत्यप्रभा या वर्तमान पत्रातुन दिनांक 25.05.2021 रोजी ई-निविदा सेलव्दारे सदर कामासाठी निविदा प्रसिध्द केल्यानुसार एकूण 02 निविदा प्राप्त झाल्या प्राप्त निविदा त्रिसदस्यीय समितीसमोर दिनांक 29.06.2021 रोजी उघडण्यात आल्या असता त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदाराने दिलेला दर |
|---|---|---|
| 01 | जी.जे. कन्सट्रक्शन नांदेड | 1.86% कमी दर |
| 02 | कामारीकर कन्सट्रक्शन नांदेड | 2.55% जास्त दर |

निविदाच्या तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा जी.जे. कन्सट्रक्शन नांदेड यांची असुन जी अंदाजपत्रकिय दरापेक्षा 1.86% कमी दराची आहे.

करिता जी.जे. कन्सट्रक्शन नांदेड यांची निविदा अंदाजपत्रकिय दरापेक्षा 1.86% कमी + GST या दराने संविदा करणेकामी मान्यतेस्तवचा प्रस्ताव मनपा स्थायी समिती सभेसमोर सादर.

**विषय क्रं. 05**

**विषय :-** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजने अंतर्गत नावाशमनपा हद्दीत प्रभाग क्रं. 18 मध्ये पक्कीचाळ ते विपश्यन केंद्र पर्यंतच्या रस्त्यावर स्ट्रीट लाईट बसविणे.

**संदर्भ :-** मा. जिल्हाधिकारी नांदेड यांचे प्रशासकिय मान्यता आदेश क्रं. 2021/नपाप्र/टे-6/ लो.अ.भा.सास.ना.व/मनपा/सिआर-58 दिनांक 31.03.21 रु. 49,97,927/-

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजने अंतर्गत नावाशमनपा हद्दीत प्रभाग क्रं.18 मध्ये पक्कीचाळ ते विपश्यन केंद्र पर्यंतच्या रस्त्यावर स्ट्रीट लाईट बसविणेसाठी रुपये 44,62,435/- करिता ई-निविदा सुचना क्रं. नावाशमनपा/साबांवि/1534/21 दिनांक 25.05.21 अन्वये दैनिक लोकमत विभागीय पातळी / दैनिक सत्यप्रभा या वर्तमान पत्रातुन दिनांक 26.05.21 रोजी ई – टेंडींग सेलव्दारे सदर कामासाठी निविदा प्रसिध्द केल्यानुसार एकूण 02 निविदा प्राप्त झाल्या प्राप्त निविदा त्रिसदस्यीय समितीसमोर दि. 01.07.21 रोजी उघडण्यात आल्या असता त्यांचा निविदाच्या तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा एल. अन्ड एस. कन्स्ट्रक्शन नांदेड यांची असुन जी अंदाजपत्रकिय दरापेक्षा 0.01% कमी दराची आहे.

**करिता प्रभाग क्रं. 18 मध्ये पक्कीचाळ ते विपश्यन केंद्र पर्यंतच्या रस्त्यावर स्ट्रीट लाईट बसविणेसाठी एल. अन्ड एस. कन्सट्रक्शन नांदेड यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.01% कमी + GST या दराने संविदा करणेकामी मान्यतेस्तव प्रस्ताव मनपा स्थायी समिती सभेसमोर सादर.**

Scanned with CamScanner

विषय क्रं. 06

**विषय :-** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजने अंतर्गत नावाशमनपा हद्दीत प्रभाग क्रं. 17 मध्ये गोवर्धनघाट स्मशानेभुमीच्या शेजारी असलेल्या बौध्दविहारा पासून ते समाज झोपडपट्टी पर्यंत आरसीसी रस्ता व आरसीसी नाली चे काम करणे उर्वरीत काम करणे.

**संदर्भ :-** मा. जिल्हाधिकारी नांदेड यांचे प्रशासकिय मान्यता आदेश क्रं. 2021/नपाप्र/टे-6/लो.अ.भा.सास.ना.व/मनपा/सिआर-58 दिनांक 31.03.21 रु. 50,00,000/-

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजने अंतर्गत नावाशमनपा हद्दीत प्रभाग क्रं.17 गोवर्धनघाट स्मशानभुमिच्या शेजारी असलेल्या बौध्द विहारापासून ते समाज झोपडपट्टी पर्यंत आर.सी.सी. रस्ता व आर.सी.सी. नाली चे काम करणे. उर्वरीत काम करणेसाठी रुपये 42,86,011/- करिता ई-निविदा सुचना क्रं. नावाशमनपा/साबांवि/1534/21 दिनांक 25.05.21 अन्वये दैनिक लोकमत विभागीय पातळी / दैनिक सत्यप्रभा या वर्तमान पत्रातुन दिनांक 26.05.21 रोजी ई – टेंडींग सेलव्दारे सदर कामासाठी निविदा प्रसिध्द केल्यानुसार एकूण 04 निविदा प्राप्त झाल्या प्राप्त निविदा त्रिसदस्यीय समितीसमोर दि. 29.06.21 रोजी उघडण्यात आल्या असता त्यांचा निविदाच्या तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा स्वास्तीक कन्स्ट्रक्शन नांदेड यांची असुन जी अंदाजपत्रकिय दरापेक्षा 0.99% कमी दराची आहे.

**करिता प्रभाग क्रं. 17 गोवर्धनघाट स्मशानभुमीच्या शेजारी असलेल्या बौध्दविहारापासून ते समाज झोपडपट्टी पर्यंत आर.सी.सी रस्ता व आर.सी.सी. नाली चे काम करणे. उर्वरीत काम करणेसाठी स्वातीक कन्सट्रक्शन नांदेड यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.99% कमी + GST या दराने संविदा करणेकामी मान्यतेस्तव प्रस्ताव मनपा स्थायी समिती सभेसमोर सादर.**

विषय क्रं. 07

**विषय :-** मनपा हद्यीत झोन क्रं. 1, 2 व 3 (नांदेड उत्तर भाग) मधील सार्वजनिक पथदिव्यांची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती करणारे खाजगी कंत्राटदार मे. जय इन्टरप्रायझेस परभणी यांना मुदतवाढ देणे बाबत

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या हद्यीमधील झोन क्रं. 1, 2 व 3 (नांदेड उत्तर भाग) मधील सार्वजनिक पथदिव्यांची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती करणे व पथदिवे दैनंदिन चालू बंद करण्याचे काम कार्यारंभ आदेश क्रं. मनपा/विधुत/16968/2018-19 दिनांक 20.02.2019 नुसार **मे. जय इन्टरप्रायझेस परभणी** यांना एक वर्षासाठी देण्यात आले होते. मनपा हद्यीतील सर्व सार्वजनिक पथदिव्यांचे रुपांतर एलईडी मध्ये करणे व पुढील सात वर्ष सदरील पथदिव्यांचे दैनंदिन देखभाल व दुरुस्ती करणेच्या कामासाठी शासनाच्या निर्देशानुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने EESL कंपनीसोबत दिनांक 18.10.2019 रोजी करारनामा केलेला होता परंतुसदरील कंपनीने काम सुरु करीत नसल्यामुळे व सार्वजनिक पथदिव्यांचे दैनंदिन देखभाल व दुरुस्तीचे काम चालु ठेवणे आवश्यक असल्याने **मे. जय इन्टरप्रायझेस परभणी** यांना मंजुर दरानुसार प्रथम मुदतवाढ दि. 20.02.20 ते 19.05.20 पर्यंत आदेश क्रं. मनपा/विधुत/13040/2019-20 दि. 12.02.20 नुसार एकूण तिन महिण्यासाठी देण्यात आले होते तदनंतर संबंधीतांना दि. 20.05.20 ते 19.08.20 पर्यंत आदेश क्रं. मनपा/विधुत/927/2020-21 दिनांक 22.05.20 नुसार द्वितीय मुदतवाढ देण्यात आले होते. मा. स्थायी समितीचा ठराव क्रं. 17 दिनांक 30.07.20 च्या मान्यतेने **मे. जय इन्टरप्रायझेस परभणी** यांना दि. 20.08.20 ते 19.02.21 पर्यंत एकूण सहा महिण्यासाठी तिसरे मुदतवाढ आदेश क्रं मनपा/विधुत/4531/20-21 दिनांक 19.08.20 नुसार

Scanned with CamScanner

देण्यात आले आहे. मा. स्थायी समितीचा ठराव क्रं. 109 दिनांक 03.03.21 नुसार दि. 20.02.21 ते 19.04.21 पर्यंत एकूण दोन महिण्यासाठी मुदतवाढ देण्यात आलेली आहे. मा. स्थायी समितीचा ठराव क्रं. 04 दि. 16.04.21 नुसार दि. 20.04.21 ते 19.07.21 नुसार तिन महिण्यासाठी मुदतवाढ देण्यात आलेली आहे. त्यानंतर मा. स्थायी समितीचा ठराव क्रं. 37 दि. 27.07.21 नुसार दि. 20.07.21 ते 19.08.21 पर्यंत एक महिण्यासाठी मुदतवाढ देण्यात आलेली आहे. त्यानुसार संबंधीतांकडून सदरील काम चालू आहे व सदरील कामाची मुदत दिनांक 19.08.21 रोजी संपत असुन मनपा हद्यीमधील झोन क्रं. 1, 2 व 3 (नांदेड उत्तर भाग) मधील सार्वजनिक पथदिव्यांची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती करणे व पथदिवे दैनंदिन चालू बंद करण्याचे कामासाठी नविन खाजगी कंत्राटदाराची नेमणुक करण्याची कार्यवाही चालू असल्यामुळे या कामासाठी **मे. जय इन्टरप्रायझेस परभणी** यांना मंजुर दरानुसार दिनांक 20.08.21 ते 19.10.21 पर्यंत पुढील दोन महिण्यासाठी मुदतवाढ देणेसाठीचा प्रस्ताव मनपा स्थायी समिती सभेसमोर सादर.

**विषय क्रं. 08**

**विषय :-** मनपा हद्यीत झोन क्रं. 4, 5 व 6 (नांदेड दक्षिण भाग) मधील सार्वजनिक पथदिव्यांची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती करणारे खाजगी कंत्राटदार मे. नांदेड इलेक्ट्रीकल इंजिनिअर्स नांदेड यांना मुदतवाढ देणे बाबत

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या हद्यीमधील झोन क्रं. 1, 2 व 3 (नांदेड दक्षिण भाग) मधील सार्वजनिक पथदिव्यांची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती करणे व पथदिवे दैनंदिन चालू बंद करण्याचे काम कार्यारंभ आदेश क्रं. मनपा/विधुत/16967/2018-19 दिनांक 20.02.2019 नुसार **.नांदेड इलेक्ट्रीकल इंजिनिअर्स नांदेड** यांना एक वर्षासाठी देण्यात आले होते. मनपा हद्यीतील सर्व सार्वजनिक पथदिव्यांचे रुपांतर एलईडी मध्ये करणे व पुढील सात वर्ष सदरील पथदिव्यांचे दैनंदिन देखभाल व दुरुस्ती करणेच्या कामासाठी शासनाच्या निर्देशानुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने EESL कंपनीसोबत दिनांक 18.10.2019 रोजी करारनामा केलेला होता परंतुसदरील कंपनीने काम सुरु करीत नसल्यामुळे व सार्वजनिक पथदिव्यांचे दैनंदिन देखभाल व दुरुस्तीचे काम चालु ठेवणे आवश्यक असल्याने **नांदेड इलेक्ट्रीकल इंजिनिअर्स नांदेड** यांना मंजुर दरानुसार प्रथम मुदतवाढ दि. 20.02.20 ते 19.05.20 पर्यंत आदेश क्रं. मनपा/विधुत/13039/2019-20 दि. 12.02.20 नुसार एकूण तिन महिण्यासाठी देण्यात आले होते तदनंतर संबंधीतांना दि. 20.05.20 ते 19.08.20 पर्यंत आदेश क्रं. मनपा/विधुत/928/2020-21 दिनांक 22.05.20 नुसार द्वितीय मुदतवाढ देण्यात आले होते. मा. स्थायी समितीचा ठराव क्रं. 16 दिनांक 30.07.20 च्या मान्यतेने **नांदेड इलेक्ट्रीकल इंजिनिअर्स नांदेड** यांना दि. 20.08.20 ते 19.02.21 पर्यंत एकूण सहा महिण्यासाठी तिसरे मुदतवाढ आदेश क्रं मनपा/विधुत/4532/20-21 दिनांक 19.08.20 नुसार देण्यात आले आहे. मा. स्थायी समितीचा ठराव क्रं. 110 दिनांक 03.03.21 नुसार दि. 20.02.21 ते 19.04.21 पर्यंत एकूण दोन महिण्यासाठी मुदतवाढ देण्यात आलेली आहे. मा. स्थायी समितीचा ठराव क्रं. 03 दि. 16.04.21 नुसार दि. 20.04.21 ते 19.07.21 नुसार तिन महिण्यासाठी मुदतवाढ देण्यात आलेली आहे. त्यानंतर मा. स्थायी समितीचा ठराव क्रं. 38 दि. 27.07.21 नुसार दि. 20.07.21 ते 19.08.21 पर्यंत एक महिण्यासाठी मुदतवाढ देण्यात आलेली आहे. त्यानुसार संबंधीतांकडून सदरील काम चालू आहे व सदरील कामाची मुदत दिनांक 19.08.21 रोजी संपत असुन मनपा हद्यीमधील झोन क्रं. 1, 2 व 3 (नांदेड दक्षिण भाग) मधील सार्वजनिक पथदिव्यांची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती करणे व पथदिवे दैनंदिन चालू बंद करण्याचे कामासाठी नविन खाजगी कंत्राटदाराची नेमणुक करण्याची कार्यवाही चालू

Scanned with CamScanner

असल्यामुळे या कामासाठी नांदेड इलेक्ट्रीकल इंजिनिअर्स नांदेड यांना मंजुर दरानुसार दिनांक 20.08.21 ते 19.10.21 पर्यंत पुढील दोन महिन्यासाठी मुदतवाढ देणेसाठीचा प्रस्ताव मनपा स्थायी समिती सभेसमोर सादर.

विषय क्रं. 09

विषय :- साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारयोजने अंतर्गत चौफाळा येथे पाण्याची टाकी उभारणे बाबत.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाच्या साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजने अंतर्गत चौफाळा येथे पाण्याची टाकी उभरणे या कामासाठी सातवी वेळ ई-निविदा सुचना क्रं. नावाशमनपा/पापुवजनि/699/2021 दिनांक 27.04.21 अन्वये (1) दै. पुढारी विभागीय पातळी (2) दै. उद्याचा मराठवाडा या वृतमान पत्रातुन दि. 28.04.21 रोजी प्रसिध्द केल्यानुसार एकूण 02 निविदा प्राप्त झाल्या पात्र एक निविदा धारकांचा लिफाफा क्रं. 02 (Price bid) त्रिसदस्यीय समिती समोर उघडण्यात आली असता दर खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | अंदाजपत्रकीय दर | कंत्राटदाराने दिलेले दर | शेरा |
|---|---|---|---|---|
| 01 | दिपक विठ्ठल चव्हाण, परभणी | रु.1,72,37,355/- | 21% जास्त रु. 2,08,57,199/- | L1 |

संबंधीत कंत्राटदारास दुस-यांदा कार्यालयीन पत्र क्रं. नावाशमनपा/पापुवजनि/5092/21 दिनांक 18.08.21 अन्वये वाटाघाटीस बोलावण्यात आले असता कंत्राटदार श्री दिपक विठ्ठलराव चव्हाण परभणी यांनी दिनांक 20.08.21 रोजी पत्र देऊन वाटाघाटी अंती दर कमी न करता 21% जास्त दराने रुपये 2,08,057,199/- (अक्षसरी रुपये दोन कोटी आठ लक्ष सत्तावन हजार एकशे नव्यान्नव फक्त) एवढयास रक्कमेवर काम करण्यास समंती दिली असून सदर दर चालु दरसुची सालसन 2021-22 नुसार 3.52% कमी आहे. सदरील कामावर होणारा वाढीव खर्च रुपये 36,19,000/- मनपा निधीतुन करण्यासाठी मंजुरीस्तव व श्री दिपक विठ्ठलराव चव्हाण परभणी यांची अंदाजपत्रक दरापेक्षा 21% जास्त दराची रुपये 2,08,57,199/- (अक्षरी रुपये दोन कोटी आठ लक्ष सत्तावन हजार एकशे नव्यान्नव फक्त) एवढया रक्कमेची निविदा संविदा करणे कामी तसेच प्रशासकीय व आर्थीक मान्यतेस्तव प्रस्ताव मनपा स्थायी समिती सभे समोर मंजुरीस्तव सादर.

विषय क्रं. 10

विषय:- नांवाशमनपा हद्दीत श्री गुरु गोविंदसिंघजी स्टेडीयम विकसीत करण्यासाठी नव्याने सल्लागाराची नियुक्ती करणे बाबत.

संदर्भ:- 1)कार्यालयीन पत्र क्र. नांवाशमनपा/साबांवि/5283/2021 दि.23.08.2021

2) शशी प्रभू अण्ड असोशिएट मुंबई यांचे पत्र दि.25.08.2021

नांवाशमनपा हद्दीत श्री. गुरु गोबिंदसिंघजी स्टेडीयम विकसीत करण्यासाठी नव्याने सल्लागाराची नियुक्ती करणेसाठी ई-दरपत्रक सुचना जा. क्र. नांवाशमनपा/साबांवि/4815/2021 दि. 10.08.2021 अन्वये दुस-यांदा ई-दरपत्रक मागविले असता एकुण (02) दरपत्रक प्राप्त झाले आहेत. त्यापैकी (01) दरपत्रक पात्र झाले असल्याने निविदा समितीच्या मान्यतेनुसार दिनांक 23.08.2021 रोजी दरपत्रक उघडले असता शशी प्रभू अण्ड असोशिएट, मुंबई यांची प्रकल्प किंमतीच्या 3.40% जास्त दराचे दरपत्रक प्राप्त झाले आहे.

सदरचे दर जास्त वाटत असल्यामुळे संबंधितास संदर्भ क्र. 1 अन्वये वाटाघाटीसाठी पाचारण केले असता पात्र सल्लागार प्रत्यक्ष उपस्थित राहुन लेखीपत्र देवून सदर काम प्रकल्प किंमतीच्या 3.40% जास्त दरा ऐवजी शासन मान्यता प्राप्त होईपर्यत प्रकल्प किंमतीच्या 2.00% व शासन मान्यता प्राप्त झाल्यास प्रकल्प किंमतीच्या 3.00% जास्त दराने करण्याची लेखी संमती दिली आहे.

Scanned with CamScanner

नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-2018/प्र.क्र.54/नवि-16 मंत्रालय, मुंबई-32 दिनांक 04 जून, 2018 अन्वये सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्क व त्याच्या प्रदानाबाबत मार्गदर्शन सुचना देण्यात आल्या आहेत. सदर शासन निर्णयानुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्क प्रदानाचे प्रमाण महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत प्रकल्पांसाठी प्रकल्प किंमतीच्या प्रमाणात 3.00% आहे व इतर सर्व कामासाठी प्रकल्प किंमतीच्या प्रमाणात 2.00% आहे.

श्री. गुरु गोबिंदसिंघजी स्टेडीयम विकसीत करणेचे काम हे वैशिष्ट्यपूर्ण स्वरुपाचे असल्यामुळे तसेच महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-2018/ प्र.क्र.54/ नवि-16 मंत्रालय, मुंबई-32 दिनांक 04 जून, 2018 नुसार महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत प्रकल्पांसाठी 3.00% (प्रकल्प किंमतीच्या प्रमाणात) सल्लागार शुल्क देण्याचे नमुद असल्याने याच धर्तीवर श्री. गुरु गोबिंदसिंघजी स्टेडीयम विकसीत करण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्क प्रदानाचे प्रमाण प्रकल्प किंमतीच्या 3.00% मंजुर करण्यास हरकत नाही. तथापी याबाबत शासनाची मान्यता घेवुनच सल्लागार शुल्क अदा करण्यात येईल. शासनाची मान्यता होईपर्यंत शासन निर्णयानुसार प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्क प्रदानाचे प्रमाण प्रकल्प किंमतीच्या 2.00% प्रमाणे अदा करण्यात येईल. यास मनपा स्थायी समीतीची मंजुरी व्हावी.

करिता श्री. गुरु गोबिंदसिंघजी स्टेडीयम विकसीत करणेसाठी सल्लागार शशी प्रभू अण्ड असोशिएट, मुंबई यांनी त्यांचे दिनांक 25.08.2021 रोजीच्या पत्रान्वये लेखी सहमती दिल्यानुसार वाटाघाटी अंती प्रकल्प किंमतीच्या 3.00% दराची निविदा, शासन निर्णयानुसार नमुद 2.00% व अतिरिक्त 1.00% वैशिष्ट स्वरुपाचे काम असल्यामुळे शासनाने मान्यता प्रदान केल्यास अदा करणे अन्यथा शासन निर्णयानुसार प्रकल्प किंमतीच्या 2.00% या प्रमाणे सल्लागार शुल्क अदा करणे यास्तव निविदा मंजुरीसाठी प्रस्ताव मनपा स्थायी समिती सभेसमोर सादर.

**विषय क्रं. 11** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका क्षेत्रातील बरकत कॉम्पलेक्स ते जुना पुल या सार्वजनिक रस्त्यावर महापालिके तर्फे विकास कामांसाठी खोदकाम करण्यात आले होते व दुरुस्ती करण्यात आली होती. परंतु सदर ठिकाणी ही संपुर्ण काळी माती असल्यामुळे या रस्त्यावरील जड वाहनांच्या मोठया प्रमाणात वर्दळीमुळे सदर ठिकाणी पुर्वी खोदकाम केलेला खड्डा हा वाढती जड वाहनाची वर्दळ लक्षात घेऊन न बुजविण्यात आल्यामुळे व शहरात झालेल्या अतिवृष्टीमुळे या ठिकाणी भुसंखलन होऊन तो खड्डा मोठया प्रमाणात पडला होता व ते बुजविण्याचे काम प्रस्तावित होते.

दरम्यानच्या काळात या रस्त्यावरुन अब्दुल हसीब यांचा मुलगा मोहम्मद तल्हा रा. रहेमतनगर नांदेड वय 19 वर्ष हा रात्रीच्या वेळेस दुचाकी वाहनांवरुन जात असतांना सदर खड्डामुळे दिनांक 10.08.21 रोजी त्याचा नैसर्गिक अपघात होऊन ते गंभररित्या जखमी होऊन डोक्यास मार लागल्यामुळे रुग्णालयात उपचारा दरम्यान दिनांक 18.08.21 रोजी मृत पावले आहे.

संबंधीतांच्या कुटूंबात तो एकमेव व्यक्ती कमावता होता व त्याचे वडील डायलिसीसवर असल्यामुळे संपुर्ण कुटूंबांचा उदरनिर्वाह त्याच्यावर अवलंबुन असल्यामुळे सदयस्थितीत त्यांच्या कुटूंबांचा उदरनिर्वाहाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

Scanned with CamScanner

उक्त बाब विचारात घेता त्यांच्या कुटूंबातील जुबेर अहेमद अब्दुल हसीब यांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार महापालिकेतील कोणत्याही पदावर महानगरपालिका अधिनियमातील कलम 53 मधील तरतुदीनुसार सहानुभुतीच्या व मानवतेच्या दृष्टीकोणातुन प्रथमतः सहा महिण्याच्या कलावधीसाठी नियुक्ती देणे करिता ही स्थायी समिती सर्वानुमते मान्यता देते.

सुचक :- शबाना बेगम मो. नासेर अनुमोदक :- रिहानाब बेगम चाँद पाशा कुरेशी

विषय क्रं. 12

प्रस्ताव

सालसन 2000 मध्ये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका आस्थापनेवर विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन म्हणजेच जाहिराती काढून अधिनियमातील तरतुदीनसार कर्मचारी निवड समिती समोर मुलाखती घेवुन निवड समितीने पात्र उमेदवारांची शिफारस केल्यानुसार महापालिका आस्थापनेवर 01 संगणक चालक व 10 कनिष्ठ अभियंता यांची प्रतिमाह एकत्रीत वेतनावर नियुक्ती करण्यात आली होती.

या 01 संगणक चालक व 10 कनिष्ठ अभियत्यांना पदनिर्मितीसह सेवेत सामावुन घेण्याबाबत महापालिकेने नगरविकास विभागाकडे शासन मान्यतेसाठी सादर केलेल्या प्रस्तावास विभागचे शासन निर्णय क्रमांक एनव्हीसी-2002/1350/प्र.क्र.157/03/नवि-22 दिनांक 17.08.2004 च्या शासन निर्णयाव्दारे दिलेल्या मान्यतेनुसार संबंधीतांना दिनांक 01.01.2005 पासुन महापालिका आस्थापनेवर वेतनश्रेणीत स्थायी पदावर सेवेत सामावुन घेतले आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाने डॉ. (श्रीमती) चंचल गोयल विरुध्द राजस्थापन शासन सिव्हील अपील क्रं. 7744/97 या प्रकरणी दिनांक 18.02.2003 रोजी पारीत केलेल्या आदेशात स्पष्ट केले आहे की मुळ नियुक्ती विहित मार्गाने केलेली असल्या शिवाय सेवा नियमीत करता येणार नाही.

यानुसार महानगरपालिका आस्थापनेवरील 01 संगणक चालक, 10 कनिष्ठ अभियंता मुळ नियुक्ती विहित मार्गाने करण्यात आली असल्याने त्यांना सेवेत सामावुन घेतले आहे.

शासनाचे वित्त विभागाचे शासन निर्णय क्रं. मप्रन्या-2012/प्र.क्र.69/2012/सेवा-3 दिनांक 07.10.2016 च्याशासन निर्णयात कालबध्द पदोन्नती/सेवा अंतर्गत अश्वसीत योजनेच्या प्रयोजनासाठी तात्पुरती सेवा विचारात घेण्या बाबत नमुद केले आहे.

यानुसार उपरोक्त आस्थापनेवरील 01 संगणक चालक, 10 कनिष्ठ अभियंता यांची सन 2000 ते 30.12.2004 या कालावधीतील तात्पुरती सेवा कोणतेही आर्थीक लाभ न देता केवळ काल्पनीक वेतनवाढ देवुन हि सेवा कालबध्द पदोन्नती/सुधारीत सेवा अंतर्गत आश्वसीत प्रगती योजनेच्या प्रयोजनासाठी उक्त शासन निर्णयातील तरतुदीनुसार विचारात घेण्याबाबत मान्यता देण्यात येते व यासाठी आवश्यकती शासनाची मान्यता घेण्यात यावी असे ही मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

सुचक :- बापुराव गजभारे अनुमोदक:- शबाना बेगम मो. नासेर

विषय क्रं. 13

प्रस्ताव

महानगरपालिका अस्थापनेवर जिवरक्षक / प्रशिक्षक या पदावर विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन स्थायी समितीने ठराव क्रं. 104 दिनांक 07.05.2003 रोजी दिलेल्या मान्यतेनुसार दिनांक 04.08.2003 रोजी नियुक्ती करण्यात आली होती. यानंतर नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभेने दिनांक 07.06.2007 रोजी ठराव क्रं. 18 व्दारे दिलेल्या मान्यतेनुसार एकत्रीत वेतनावरील जिवरक्षक / प्रशिक्षक यांची एकत्रीत वेतनावरुन शासन मान्य स्विमींग इन्स्ट्रक्टर या पदावर वेतनश्रेणी रुपये 4500-7000 मध्ये दिनांक 14.08.2007 रोजी सेवेत सामावुन घेतले आहे.

Scanned with CamScanner

यानंतर महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण-3 मधील नेमणुकीच्या पध्दतीच्या तरतुदीनुसार विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन स्विमींग इन्स्ट्रक्टर या पदावरफन दिनांक 21.10.2011 रोजी स्टैडीयम व्यवस्थापक या पदावर नियुक्ती केली आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाने डॉ. (श्रीमती) चंचल गोयल विरुध्द राजस्थापन शासन सिव्हील अपील क्रं. 7744/97 या प्रकरणी दिनांक 18.02.2003 रोजी पारीत केलेल्या आदेशात स्पष्ट केले आहे की मुळ नियुक्ती विहित मार्गाने केलेली असल्या शिवाय सेवा नियमीत करता येणार नाही.

यानुसार महानगरपालिका आस्थापनेवरील 01 स्टेडियम व्यवस्थापक मुळ नियुक्ती विहित मार्गाने करण्यात आली असल्याने त्यांना सेवेत सामावुन घेतले आहे.

शासनाचे वित्त विभागाचे शासन निर्णय क्रं. मप्रन्या-2012/प्र.क्र.69/2012/सेवा-3 दिनांक 07.10.2016 च्याशासन निर्णयात कालबध्द पदोन्नती/सेवा अंतर्गत अश्वसीत योजनेच्या प्रयोजनासाठी तात्पुरती सेवा विचारात घेण्या बाबत नमुद केले आहे.

यानुसार उपरोक्त स्टेडियम वय्वस्थापक यांची दिनांक 04.08.2003 ते 13.08.2007 व दिनांक 14.08.2007 ते 24.10.2011 च्या कालावधीची एकत्रीत वेतनावरील तात्पुरती सेवा कोणतेही आर्थीक लाभ न देता केवळ काल्पनीक वेतनवाढ देवुन हि सेवा कालबध्द पदोन्नती/सुधारीत सेवा अंतर्गत आश्वसीत प्रगती योजनेच्या प्रयोजनासाठी उक्त शासन निर्णयातील तरतुदीनुसार विचारात घेण्याबाबत मान्यता देण्यात येते व यासाठी आवश्यकती शासनाची मान्यता घेण्यात यावी असे ही मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

सुचक :- शबाना बेगम मो. नासेर

अनुमोदक:- बापुराव गजभारे

(स. अजीतपालसिंघ संधु)
नगरसचिव,
नांवाशमनपा, नांदेड.

( गाडीवाले विरेंद्रसिंघ जगतसिंघ )
सभापती,
स्थायी समिती, नांवाशमनपा, नांदेड.

Scanned with CamScanner